# राज्यभरात राबविण्यात आलेले पथनाट्य अभियान



चौकातील पथनाट्य सादरीकरण, भंडारा जिल्हा



बाजारपेठेतील पथनाट्य सादरीकरण, नागपूर जिल्हा



महाविद्यालयातील पथनाट्य सादरीकरण, नागपूर जिल्हा



चौकातील पथनाट्य सादरीकरण, पुणे जिल्हा

# मनोबलाने मात करा... एड्सवर

## वाचा महेंद्रची कहाणी....

## उभारी (एड्स संसर्गितांचे स्फूर्तीदायी अनुभव)





रेड रिबन एक्सप्रेसमध्ये ग्रामीण महिलांना एचआयव्ही/एड्सविषयी माहिती सांगताना महेंद्र

महेंद्र... एक उमदं, सालस व्यक्तिमत्त्व. धंद्यात उत्तम जम बसलेला. लग्नानंतर चार वर्षांनी घरात नवीन पाहुणा येणार असल्याची चाहूल लागलेली. नियमित तपासण्या केल्या. ठराविक काळानंतर पत्नीने मुलीला जन्म दिला. दोन वर्षांनी तिला पुन्हा दिवस गेले. फॅमिली डॉक्टरने सांगितल्याप्रमाणे त्याने यावेळीही सर्व टेस्ट केल्या. परंतु यावेळी रिपोर्ट 'एचआयव्ही पॉझिटिव्ह' असे होते! दुसऱ्या लॅबमध्ये टेस्ट करून पाहिल्या पण सर्व रिपोर्ट तेच. हे झालेच कसे? आता पुढे काय? दोघांचाही एकमेकांवर पूर्ण विश्वास होता. लग्नाआधी एचआयव्ही टेस्ट केलेली. पहिल्या प्रसूतीच्या वेळी एचआयव्ही टेस्ट निगेटिव्ह होती. मग आताच कशी पॉझिटिव्ह झाली? काय चुकले काहीच समजत नव्हते. शेवटी अत्यंत विमनस्क अवस्थेत त्यांनी ठरविले की आपल्याला हा आजार आहे, हे कुणालाही सांगायचे नाही. कारण त्यामुळे आपल्याला वाळीत टाकले जाईल. तसेच यावर औषध नसल्याने कुणाला तब्येत दाखविण्याचा प्रश्नही नाही!

परंतु एक दिवस पत्नीची तब्येत खूप खालावली. हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनीही नाइलाज असल्याचे सांगितले. पत्नीचे निधन झाले. महेंद्र एकाकी पडला.

पण त्यावेळी आई धावून आली. त्यानंतर मुलीची तब्येत बिघडली. तपासण्या झाल्या. तीही एचआयव्ही पॉझिटिव्ह होती. त्याच्या पायाखालची जमीनच सरकली. मुलीला जे. जे. हॉस्पिटल मुंबई, येथे दाखल करण्यात आले. तेथे तिला एआरटी ट्रीटमेंट सुरू करण्यात आली. त्यानंतर महेंद्रची सीडी-४ची टेस्ट केली असता तो काउंट ७१२ इतका होता. चिंतेचे कारण नव्हते. दरम्यान, हॉस्पिटलच्या काऊन्सिलरने त्यास नाशिक येथील पीपल लिव्हिंग विथ एचआयव्ही/एड्स नेटवर्क या संस्थेशी संपर्क करण्यास सांगितले. नेटवर्कमध्ये त्याला प्रचंड भावनिक आधार मिळाला. तो सपोर्ट ग्रुप मीटिंगमध्ये हजर राहू लागला. तेथे महेंद्रला दिसले की, आपल्यासारख्याच अनेक एचआयव्ही संसर्गित व्यक्ती येथे आहेत परंतु त्या सर्वसामान्य जीवन जगत आहेत. त्याच्या मनावरचा ताण बराच हलका झाला. काही महिन्यांनी नेटवर्कमध्ये आऊट रीच वर्करची जागा मोकळी असल्याने तुम्ही काम कराल का, अशी विचारणा झाली. त्यानेही लगेचच हो म्हटले. अन्यायाविरुद्ध त्याचे मन बंड करून उठले होते. काहीतरी अनामिक प्रेरणेने त्याने एचआयव्ही नेटवर्कचे काम करण्याचे ठरवले. आईची साथ होतीच. तिनेही वाईटातूनही चांगलं काहीतरी कर, असे सांगितले. नेटवर्कमध्ये भेटलेल्या अनेक एचआयव्ही संसर्गित व्यक्तींचे अनुभव ऐकून त्याचे मन सुन्न झाले.

एचआयव्ही संसर्गित व्यक्तींना मिळणारी कलंक व भेदभावाची वागणूक त्याच्या जिव्हारी लागली. त्याने नव्या उभारीने काम सुरू केले. ट्रेनिंग पिरीयडमधून त्याने एचआयव्हीचे सखोल ज्ञान मिळवले. तसे पाहता एचआयव्ही संसर्ग झाल्यावरही व्यक्ती २०-२५ वर्षे सर्वसामान्य जीवन जगू शकते पण समाजाचा दृष्टीकोन, उपचारांतील वैविध्य, माहितीचा अभाव ही मोठी अडचण असल्याचे त्याला जाणवले.

डायबेटिस/ कॅन्सरमध्ये जशी आयुष्यभर औषधे घ्यावीच लागतात तशी एचआयव्ही संसर्गित व्यक्तिसही घ्यावी लागतात. मग एचआयव्हीकडेच बघण्याचा दृष्टीकोन संकुचित का? बरं, त्यानं काही फायदा होतो असेही नाही. उलट एचआयव्हीचा संसर्ग वाढत असूनही लोक उपचारास पुढे येत नाहीत. आपलेही तेच झाले, हे त्याच्या लक्षात आले. त्याने ॲडव्होकसीच्या माध्यमातून यावर लढा देण्याचे ठरवले. आज महेंद्र एचआयव्ही संसर्गित व्यक्तींना एकत्र आणतो. त्यांना मानवी हकांची जाणीव करून देतो. त्यांचे आर्थिक, कौटुंबिक, रोजगार, न्यायिक प्रश्न सोडविण्यास प्रतिनिधित्व करतो. एवढेच नव्हे, एचआयव्हीबद्दलचे अज्ञान दूर व्हावे, कुटुंबे एक रहावी, एचआयव्ही संसर्गित व्यक्तींना आदर्श मिळावा, म्हणून शाळा कॉलेजांतील तसेच इतर सभा-संमेलने, शिबिरे यांमध्ये सर्वांसमोर तो एचआयव्ही संसर्गित असल्याचे मान्य करतो. त्यावेळी उपस्थित असलेल्यांमध्येही एचआयव्हीकडे बघण्याचा दृष्टीकोन नॉर्मल होतो.

त्याच्या जीवनाला वेगळी दिशा मिळाली आहे. सहकाऱ्यांच्या तसेच शासकीय रुग्णालयातील मान्यवरांच्या मदतीने एचआयव्ही संसर्गित व्यक्तींना एकत्र आणून त्यांमध्ये जागृती करण्याचे महत्त्वाचे कार्य तो करतो. प्रत्येक एचआयव्ही संसर्गित व्यक्तीने नेटवर्कमध्ये यावे, तीस सर्व प्राथमिक माहिती मिळावी यासाठी तो धडपडतो. नेटवर्कमध्ये रक्तदान, अवयवदान, सुरक्षित संभोग या विषयीची सखोल माहिती दिली जाते. तसेच त्यांचे आयुष्य सामान्य व्हावे यासाठी समुपदेशन, विनामूल्य सल्ला व मार्गदर्शन केंद्रही चालवले जाते. संसर्गित व्यक्तींना गृहभेट देऊन, त्यांच्या तब्येतीची चौकशी, एआरटी विषयक सातत्य, कौटुंबिक अडचणी सोडविणे, शासकीय सेवा सुविधांची माहिती देणे, एचआयव्ही संसर्गित व्यक्तींना प्राथमिक ज्ञान देऊन इतर सेवाकेंद्रांशी परिचित करून त्यांच्या मार्फत इतर संसर्गित व्यक्तींमध्ये जागृती निर्माण करून लिंकवर्क किंवा पिअर एज्युकेशन तयार करणे ही कामे केली जातात.

नेटवर्कच्या माध्यमातून एचआयव्ही संसर्गित विधवा महिलांचे प्रश्न सोडविणे, महिलांचे बचतगट स्थापन करणे, महिलांच्या रोजगाराचा प्रश्न, एचआयव्ही संसर्गित लहान बालकांचे पुनर्वसन, एचआयव्ही जनजागृती तसेच प्रत्येक तालुक्यात एचआयव्ही संसर्गित व्यक्तींचे नेटवर्क उभारणे हे महेंद्रचे ध्येय आहे. तो आग्रहाने म्हणतो की, एचआयव्ही संसर्ग हा संसर्गित व्यक्तीकडूनच इतरांना होतो तरी प्रत्येकाने शासकीय रुग्णालये, आयसीटीसी केंद्रामध्ये जाऊन एचआयव्ही टेस्ट करणे आवश्यक आहे म्हणजे एचआयव्ही संसर्गास आळा बसू शकेल. तसेच संसर्गित व्यक्तींनी भोंदू बाबांऐवजी एआरटी सेंटरकडून मिळणारे मोफत उपचार घेऊन आपले आयुष्य वाढवावे, असेही तो म्हणतो.

महेंद्रने नुकतेच एका पॉझिटिव्ह महिलेशी लग्न करून तिला व स्वतःलाही आधार शोधला आहे. स्वतःचे जीवन सावरून, इतरांना सावरण्यास तो सज्ज झाला आहे. माहीत आहे, महेंद्रचे आजचे एचआयव्ही विषयीचे मत? "थँक्यू एचआयव्ही!!!"

**अधिक माहितीसाठी संपर्कः** नेटवर्क ऑफ नाशिक बाय पीपल लिव्हिंग विथ एचआयव्ही, बी. जी. १३, ठक्कर्स बझार, नवीन बझार, नवीन सीबीएस, त्र्यंबकरोड, नाशिक.
मोबाईलः ९२२५५-०५१८८

